PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Are Sansar Sansar
Year: 1981

Song: Kalya Matit Matit Tifan Chalate
Lyricist: Vitthal Wagh

काळया मातीत मातीत तिफन चालते
तिफन चालते तिफन चालते
इज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो
ढोल वाजवितो ढग ढोल वाजवितो
काळया मातीत मातीत तिफन चालते
तिफन चालते तिफन चालते
सदाशिव हाकारतो नंदी बैलाच्या जोडीला
संग पार्वती चाले ओटी बांधून पोटाला
सरीवर सरी येती माती न्हाती धूती होते
कस्तुरीच्या सुवासनं भूल जिवाला पडते
भूल जिवाला पडते वाट राघूची पाहते
राघू तिफन हाकतो मैना वाटुली पाहते
काळया मातीत मातीत तिफन चालते
सर्जा रं माझ्या ढवळया रं माझ्या
पवळया रं माझ्या

आ...... हा
झोळी झाडाला टांगून राबराबते माऊली
तिथं झोळीतल्या जीवा व्हती पारखी साऊली
अभिषेकात घामाच्या आसं देवाचं पूजन
पिकं हालती डोलती जनू करती भजन
गव्हा जोंधळयात तवा सोनं चांदी लकाकते
जशी चांदी लकाकते कपाशी फुलते
काळया मातीत मातीत तिफन चालते
चालं ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ
लोणी पायाला वाटती मऊ भिजली ढेकळं
काळया ढेकळात डोळा हिरवं सपान पाहतो
डोळा सपान पाहतो काटा पायांत रूततो
काटा पायांत रूतता लाल रगात सांडतं
लाल रगात सांडतं हिरवं सपान फुलतं
काळया मातीत मातीत तिफन चालते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*